MHBI060000982026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र ३३ /२०२६**
**मधील नि.क्र. १ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र (Heirship certificate)मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

२. अर्जदार यांनी कथन केले आहे की, मयत दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांची अर्जदार क्र. १ हे पती आहेत व अर्जदार क्र. २ व ३ ही मुले व अर्जदार क्र. ४ ही मुलगी आहे. दैवशाला भ्र. दिलीप लोमटे, रा. अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड हया दिनांक ०१/०५/२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. मयत दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांना अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. त्यांच्या मृत्युनंतर अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व इतर कामाकरीता वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) आवश्यक आहे.

३. अर्जदार यांनी अर्जाच्या पुष्ठयर्थ दिनांक १७/०१/२०२६ रोजी ''दैनिक वार्ता'' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली हरकत नोटीस (निशाणी क्र. १० )

दाखल केली. सदर हरकत नोटीस (निशाणी क्र. १०) यास कोणाचीही हरकत आलेली नाही. त्यामुळे सदर अर्ज हा विना आव्हानीत राहीला आहे. बेलीफ अहवाल निशाणी क्र. ७ पाहीला पाहता, नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड व तहसिल कार्यालय, अंबाजोगाई यांच्या कार्यालयातील बोर्डवर जाहीर नोटीसा डकवण्यात आल्या. अर्जदार यांनी त्यांच्या मागणीच्या पुष्टर्थ दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांचा मृत्युचा दाखला (निशाणी क्र. ०६ ) वर दाखल केले आहे. निशाणी क्र. ०४ वरील यादीप्रमाणे अर्जदार यांनी त्यांच्या आधारकार्डच्या साक्षांकीतप्रती दाखल केल्या आहेत. अर्जदार क्र. ०२ यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. ११ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदार यांनी पुरावा बंद झाल्याची पुरशीस निशाणी क्र. १२ वर दाखल केली आहे.

४. अर्जदारांच्या विधिज्ञाचे म्हणणे ऐकले. अर्जदारांच्या विधिज्ञातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, मयत दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांच्या वारसांना त्यांच्या मृत्युनंतर शासकीय व नियमशासकीय कार्यालयीन कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

५. अर्जास विहीत कालावधीमध्ये तसेच आजपर्यंत अर्जदाराच्या अर्जातील मागणीस कोणाचीही हरकत अथवा आक्षेप दाखल झालेला नाही. करीता, अर्जदारांचा पुरावा विना आव्हानात्मक राहीलेला आहे. अर्जदारांनी ते मयताचे कायदेशीर वारस

असल्याचे न्यायालयासमोर शपथेवर सांगितले आहे. त्यांचा पुरावा अविश्वासार्ह आहे असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल नाही. अभिलेखावरील कागदपत्र आणि अर्जदारांचा तोंडी पुरावा विचारात घेतला असे दिसुन येते की, अर्जदार हे वारस प्रमाणपत्र घेण्यास पात्र आहेत. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे या निष्कर्षाप्रत मी येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) मयत दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांच्या पश्चात अर्जदार क्र. १) दिलीपराव भगवानराव लोमटे, २) मेघराज दिलीपराव लोमटे, ३) युवराज दिलीपराव लोमटे व ४) ज्योती बालासाहेब देशमुख हे मयत दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट१८२७ चे परिशिष्ठ ब प्रमाणे अर्जदार यांनी योग्य ते मुद्रांक शुल्क दिल्यानंतर देण्यात यावा.

स्वा/-
(ए.एम.ढवळे )
३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
अंबाजोगाई

स्थळ-अंबाजोगाई
दिनांक २४.०३.२०२६

| :: **Certificate of Stenographer** :: | | |
|---|---|---|
| "I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order." | | |
| Dictated On : | 24/03/2026. | Digitally signed by AKASH BASAVRAJ KABNE Date: 2026.03.24 17:30:32 +0530 |
| Transcribed On : | 24/03/2026. | |
| Checked & Signed On : | 24/03/2026. | |
| Date :<br>Place : Ambajogai. | 24/03/2026. | **( Akash Kabne )**<br>Stenographer Grade – 3<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Ambajogai. |